**Shikshan Sanshodhan** : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN(o): 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 6.831
Volume - 7, Issue - 06, June - 2024

DOIs:10.2018/SS/202406006 --:-- Research Paper / Article / Review

# कृतीयुक्त अध्यापनाची उपयुक्तता

**उमेश गोपीनाथ घेवरीकर**

पर्यवेक्षक, पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कूल, शेवगाव जि अहमदनगर

Email - umesh.ghevarikar@gmail.com

सारांश : एकले की विसरते, पाहिलेले लक्षात राहते आणि सहभागाने आत्मसात होते. या उक्तीनुसार शिक्षण प्रक्रियेत अनुभवयुक्त शिक्षण हे पाठांततापेक्षा अधिक सकस असते. पाठ्यपुस्तकातील घटक फक्त क्क्ठ्न पद्धतीने शिकवणे हे विज्ञानासारख्या विषयाला मार्क ठरते. नव्या संकल्पना स्पष्ट होण्यासाठी कृतियुक्त अध्यापन महत्वाचे ठरते हे. वैज्ञानिक संकल्पना न समजल्याने विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची आवड निर्माण होण्यात अडथळे निर्माण होऊ शकतात. अध्ययन अनुभव ही गोष्ट महत्वाची ठरते. त्यासाठी कृतियुक्त अध्यापन किती महत्वाचे आहे हे पडताळून पाहण्यासाठी हे संशोधन केले असून यात सहभागी विद्यार्थ्यांचे विज्ञान विषयातील आकलन उंचावण्यास मदत झाली असल्याचे निष्कर्ष यातून काढले गेले आहेत.

महत्वाचे शब्द : अध्ययन पद्धती. वैज्ञानिक संकल्पना. शिक्षण विचार. प्रत्यक्ष सहभाग. विद्यार्थीकिन्द्री शिक्षण. जीवन कौशल्ये. प्रात्यक्षिके. अनुभवकेन्द्री अध्ययन.मानवी आरोग्य. विद्युत धारा. आम्ल अम्लारी. नैसर्गिक दर्शक.

## १. प्रस्तावना :

**'विद्यार्थ्यांच्या आत दडलेल्या नैसर्गिक क्षमतांना सुयोग्य वातावरण देऊन बाहेर काढणे म्हणजे शिक्षण',**अशी शिक्षणाची व्याख्या **स्वामी विवेकानंद** यांनी केली आहे तर **'शंका विचारण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना देते ते खरे शिक्षण'** असे पाश्चात्य विचारवंत **फ्रानसेस आरनोल्ड** म्हणतोआचार्य रजनीष यांनी शिक्षण पद्धती मधील सर्वात गंभीर त्रुटी म्हणजे आपले शिक्षण . फक्त पुस्तकी असून त्यात विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष सह भागाला वाव नसल्याणे ते फोल ठरत असून त्यामुळे बेरोजगारी वाढत महात्मा गांधी .असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे, आचार्य विनोबा भावे यांनी शिक्षणतील पाठांतर व पोपटपंची यापेक्षा कृतियुक्त शिक्षणावर भर देत शालेय शिक्षणात शेती, वस्तू उत्पादन आणि कार्यानुभवयांचा आवर्जून समावेश केला जावा अशी आग्रही भूमिका मांडली.

या थोर शिक्षणतज्ञांचे विचारमंथन किती सखोल आणि वास्तववावर आधारित होते ते आज आपल्याला दिसून येते आहे . वर्गातील शिक्षणाचा प्रत्यक्ष जगण्याशी, व्यवहाराशी अजिबात संबंध न उरल्याने आज पदवी घेतलेल्या मुलांना व्यवहारातील साध्या, साध्या गोष्टी करता येत नाहीतचिकित्सक विचार ., सर्जनशीलता, सहकार्य, संवाद कौशल्य या चार बेसिक जीवन कौशल्याचे धडे त्यांना पुन्हा देण्याची आवश्यकता निर्माण होत असल्याचे विदारक चित्र समाजात दिसून येते आहेशासन . शिक्षणावर करत असलेला प्रचंड खर्च वाया जात असून शिक्षण अबोध, बोजड, अगम्य , क्लिष्ट आणि नीरस वाटल्याने विद्यार्थी मनाने आणि शरीराने शालाबाह्य होण्याचे प्रमाण वाढते आहे.

ऐकले की विसरते, पहिले की लक्षात राहते आणि सहभागाने आत्मसात होते या उक्तीप्रमाणे या शोध निबंधात कृतियुक्त अध्यापन आणि अध्ययनात विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग यांचा विचार करण्यात आला आहेत्यासाठी इयता आठवीच्या . व ५० विज्ञान विषयाची वि्द्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती .त्या प्रयोगाचे फलित म्हणजे हा शोध निबंध आहे .

## २. पुरावलोकन :

विज्ञान विषयातील संकल्पना विद्यार्थ्यांना समजल्या तरच त्यांना विज्ञान विषयाची आवड निर्माण होऊ शकतेअन्यथा . नुसत्या कथन पद्धतीने किंवा पाठ्यपुस्तक वाचूनदाखवले तर संकल्पना स्पष्ट न झाल्याने त्यांना त्या विषयाची गोडी लागत नाही .

म्हणून पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कूल, शेवगांव जिमहाराष्ट्र ) अहमदनगर .} या शाळेतील ईयत्ता आठवीच्या अ तुकडीतील तीस विद्यार्थ्यांची निवड करून त्यांच्या विज्ञान विषयाच्या पाठ्यपुस्तकातील खालील पाठ्यघटकांची निवड केली . त्याच वेळी इयत्ता आठवीच्या ब तुकडीतील सर्व .या घटकांचे अध्यापन प्रत्यक्ष विद्यार्थी सहभागाद्वारे करण्यात आले जो पाठ विहित अभ्यास क्रमानुसार .विद्यार्थ्यांना मात्र केवळ कथन पद्धतीने तेच घटक शिकवण्यात आले ज्या काळात शिकवण्यात आला त्या पाठावर आधारित कृती त्या त्या काळात पूर्ण करून घेण्यात आली .

**निवड करण्यात आलेले पाठ्यघटक**

**१ डोअर बेल तयार करणे**

**२ स्वत:चा रक्तगट स्वत: प्रयोगशाळेत जाऊन तपासणे, त्याची पद्धती समजून घेणे**

**३ एकाच बाकावर बसणाऱ्या दोन मित्रमैत्रिणी यांनी आपल्या मित्राचा .मैत्रिणीचा रक्तदाब तपासणे /**

**४ परिसरातील सहज उपलब्ध पदार्थवापरून नैसर्गिक दर्शक तयार करणे .**

## ३. कार्य पद्धती:

वर्ग अध्यापन करताना त्या, त्या पाठातील सर्व घटक समजून देण्यात आले. त्या नंतर निवड केलेल्या ३० विद्यार्थ्यांनी वरील पाचही कृती प्रत्यक्ष करून पूर्ण करायला सांगितल्यात्यासाठी .त्यासाठी त्याना प्रत्येक कृतीसाठी पर्याप्त वेळ देण्यात आला . शिक्षक, पालक किंवा मित्र , त्या, त्या विषयातील तज्ञ व्यक्ती यांचे मार्गदर्शन घेण्याची मुभा देण्यात आलीशंका विचारण्याचे ., चर्चा करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले .

## ४. तक्ता :

| घटक | सलग्न पाठ | पाठ्य घटक | सहभागी विद्यार्थी | कृती पूर्ण केलेले विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| डोअर बेल | विद्युत | विजेचे उपयोग | ३० | ३० |
| रक्तगट ज्ञात करून घेणे | मानवी आरोग्य | रक्ताची घटना | ३० | ३० |
| रक्तदाब तपासणे | रोग व उपाय | रक्तदाब | ३० | ३० |
| नैसर्गिक दर्शक तयार करणे | आम्ल व आम्लरी | दर्शक | ३० | ३० |

## ५. फलनिष्पत्ती:

- कथन पद्धतीने शिकवलेल्या आठवी ब मधील मुलांपेक्षा या उपक्रमात सहभागी असलेल्या ३० विद्यार्थ्यांना वरील सर्व घटक व त्यातील वैज्ञानिक संकल्पना, तत्वे , नियम अधिक चांगली समजली हे नंतर घेतलेल्या लेखी चाचणी वरून सिद्ध झाले .

- प्रत्यक्ष सहभागतून शिकतांना विद्यार्थी तणावमुक्त व आनंदी रहातातया पद्धतीत त्यांच्या कल्पनाशक्तीला., विचार प्रक्रियेला अधिक वाव मिळत असल्याने त्यांची विज्ञान विषय व एकूणच शिक्षणतील गती व रूची वाढीस लागली .
- परस्पर सहकार्य, सर्जनशीलता, संवाद कौशल्य, चिकित्सक विचार ही एकविसाव्या शतकातील कौशल्ये वाढीस लागून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित होत असल्याचे आढळून आले.
- .विज्ञान विषयाची भीती कमी होऊन या विषयाची आवड निर्माण झाल्याचे आढळून आले
- विद्यार्थी मनाने शाळेशी जोडले जाऊन ते भविष्यात शालाबाह्य होण्याची शक्यता कमी झाल्याचे दिसून आले .
- पाठांतरांपेक्षा अनुभव सिद्ध शिक्षणाचे महत्व अधोरेखित झाले .

## संदर्भ सूची :

१. www.amarujala.com

२.www.shiksha.com

३.www.oshoworld.com

४.www.hemantlagvankar.com

५. www.sciencedirect.com

६. शिक्षण विचार—लेखक- विनोबा भावे- वर्धा

७. शिक्षणशास्त्र व अध्यापन पद्धती—डॉ.स्नेहलता जोशी— के. भ. ढवळे प्रकाशन,पुणे

८.विज्ञान शिक्षणातील नवे आयाम- डॉ.मोहन आपटे, मनोविकास प्रकाशन.